



# धाराशिव जिल्ह्यात उभरतं युवक नेतृत्व : शंतनू पायाळ

## पायाळ यांच्या पुढाकारातून रोजगार, उद्योग आणि जनसंवादाचा व्यापक उपक्रम...

**सुधीर लोमटे**

**धाराशिव, दि.१ एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक घडामोडींमध्ये सध्या एक नाव विशेष चर्चेत येत आहे, ते म्हणजे शंतनू पायाळ. युवकांशी थेट संवाद, रोजगारनिर्मितीसाठी ठोस उपक्रम आणि ग्रामस्तरावर सातत्याने उपस्थिती या बळावर ते भावी युवक नेतृत्व म्हणून उदयास येत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शंतनू पायाळ यांनी केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता युवकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. धाराशिव येथे आयोजित भव्य नोकरी महोत्सवातून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या, ही त्यांची कार्यक्षमतेची ठळक झलक ठरली. अशा उपक्रमांमुळे बेरोजगार युवकांना दिशा मिळत असून, त्यांच्या भवितव्यासाठी नवे मार्ग खुले होत आहेत.

याशिवाय, गावागावांत जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यपद्धती विशेष लक्षवेधी ठरत आहे. 'चाय पे चर्चा', सदिच्छा भेटी, ग्राम संवाद अशा माध्यमांतून त्यांनी लोकांशी जिव्हाळ्याचं नातं निमाण केलं आहे. शेती, उद्योग, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला असून स्थानिक



उद्योगांना प्रोत्साहन देणे, शेतकऱ्यांशी संवाद साधणे आणि आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून जनजागृती करणे यांसारखे उपक्रम त्यांनी राबवले आहेत.

युवकांमध्ये वाढत असलेला विश्वास, जनतेशी असलेला थेट संपर्क आणि विकासाभिमुख दृष्टीकोन यामुळे शंतनू पायाळ हे धाराशिव जिल्ह्यातील भावी युवक नेतृत्व म्हणून पुढे येत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. आगामी काळात त्यांच्या कार्याचा विस्तार अधिक व्यापक होईल, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त केली जात आहे. धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर विधानसभा मतदारसंघात युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देत विकासाचा मार्ग अधिक भक्कम करण्यासाठी शंतनू पायाळ यांच्या पुढाकारातून विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे चित्र अलीकडील कार्यक्रमांतून स्पष्ट झाले. रोजगार निर्मितीपासून ग्रामविकास, आरोग्य सेवा आणि जनसंवादापर्यंत अनेक क्षेत्रांत सकारात्मक कामगिरी करत त्यांनी स्थानिक पातळीवर विश्वास निर्माण केला आहे.

पुष्पक मंगल कार्यालय, धाराशिव येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते आयोजित भव्य नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळावा उत्साहात पार पडला. या महोत्सवाला तब्बल २२०० हून अधिक उमेदवारांनी उपस्थिती लावली. विशेष म्हणजे ५२ नामांकित कंपन्यांच्या सहभागातून

उर्वरित पान १२ वर...













सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## घरफोडीत सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१ एप्रिल -**
तालुक्यातील आष्टाकासार येथे घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शशिकांत आप्पाराव बलसुरे (वय ६१, रा. आष्टाकासार, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांच्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१२ मार्च रोजी रात्रीच्या दरम्यान तोडून घरात प्रवेश केला. यावेळी घरातील कपाटातून सुमारे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख ५ हजार रुपये असा एकूण सुमारे ५० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी शशिकांत बलसुरे यांनी दि.३१ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून मुरुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



## उपअभियंता दत्तात्रय पाचंगे यांचा सत्कार व निरोप

**कळंब, दि.१ एप्रिल -**
जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग कळंब येथील उपअभियंता दत्तात्रय तुळशीराम पाचंगे हे वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असून, त्यांचा सपत्नीक सत्कार व निरोप समारंभ पंचायत समिती कळंबच्या सभागृहात पार पडला. केवळ सात महिन्यांच्या कार्यकाळात पाचंगे यांनी हिंगणगाव, आढाळा, आंदोरा आदी गावांच्या पाणीपुरवठा प्रश्नांवर तोडगा काढत, माळकरंजा येथील दीर्घकालीन समस्या मार्गी लावली. तसेच येरमाळा तीर्थक्षेत्राच्या वाढत्या गरजेनुसार पाणीपुरवठा प्रकल्पाला गती देत सांडपाणी व्यवस्थापनालाही चालना दिली. वाशी येथील अतिरिक्त पदभार सांभाळूनही त्यांनी कामे प्रभावीपणे पूर्ण केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या प्रामाणिक, पारदर्शक व मनमिळाऊ स्वभावाचे कौतुक करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास पंचायत समितीचे पदाधिकारी, अधिकारी, अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.



## चैत्र पौर्णिमेनिमित्त पाणीपोईचे उद्घाटन

**तुळजापूर, दि.१ एप्रिल -**
दरवर्षीप्रमाणे चैत्र पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर मंदिराच्या महाद्वारासमोर पाणीपोईचे उद्घाटन करण्यात आले. कै. श्रीराम हरिश्चंद्र क्षीरसागर यांच्या स्मरणार्थ पुजारी शुभम श्रीराम क्षीरसागर यांच्या पुढाकारातून फिल्टर जारमधील थंड पाण्याची मोफत व्यवस्था भाविकांसाठी करण्यात आली आहे. चैत्र पौर्णिमेनिमित्त मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असल्याने त्यांना स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने ही सुविधा सुरू करण्यात आली आहे. यावेळी गोपाळ पवार, ओम दरेकर, अमित छत्रे, अक्षय करडे, विराज कोथिंबीर, गवळी, कुणाल जाधव, जयसिंग क्षीरसागर, धनंजय शिंदे, संग्राम पलंगे, राहुल पवार, दिगंबर चव्हाण यांच्यासह शुभम क्षीरसागर यांचा मित्रपरिवार व पुजारी समूह उपस्थित होता.

# कामगारच निघाला दरोडेखोर; दाळींब येथील दरोडा प्रकरण उघड

### दोन आरोपी ताब्यात, सहा जण फरार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ एप्रिल -**
सोलापूर-हैद्राबाद महामार्गावरील दाळींब येथे घडलेल्या दरोडा प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला असून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणातील इतर सहा आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

दि. २८ मार्च २०२६ रोजी फिर्यादी हृषिकेश जाधव (रा. लातूर) यांची गाडी दाळींब येथे सहा अनोळखी इसमांनी आडवून त्यांना व चालकाला मारहाण केली. त्यानंतर मुरूम येथून माल उतरवून मिळालेली १ लाख १४ हजार रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने लुटून नेली. याप्रकरणी मुरूम पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७७/२०२६ अंतर्गत भा.न्या.सं. कलम ३१०(२), ३११ अन्वये दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीमती रितू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने तपासाचे आदेश दिले. त्यानुसार तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयितांचा माग काढत दि. ३१ मार्च रोजी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. तपासात आरोपी अभिषेक राजेंद्र कावडे (वय १९, रा. कंटेकूर) हा मुरूम येथील उज्वला किराणा दुकानात काम करत असल्याचे समोर आले. फिर्यादी जाधव यांनी त्याच दुकानात माल उतरवून रोख रक्कम घेतल्याचे पाहून कावडे याने आपल्या साथीदारांसह दरोड्याचा कट रचला. त्यानुसार मोटारसायकल व पांढऱ्या रंगाच्या इनोव्हा कारमधून फिर्यादींचा पाठलाग करून दाळींब येथे महामार्गावर त्यांना अडवण्यात आले व मारहाण करून रक्कम लुटण्यात आली. या प्रकरणात अभिषेक कावडे व दत्ता व्यंकट जमादार (वय ३३, रा. कंटेकूर, ता. उमरगा) यांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून २० हजार रुपये रोख व दोन मोबाईल असा एकूण ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, या गुन्ह्यातील उर्वरित सहा आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. अटक आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाईसाठी मुरूम पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व त्यांच्या पथकाने केली.



## सोशल मीडियावरून कुटुंबाची माफी मागत तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१ एप्रिल -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. सोशल मीडियावरून कुटुंबाची माफी मागत एका ३० वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, कैलास राजेंद्र पांचाळ (वय ३०) यांनी तेर-ढोकी रोडवरील आंधळे यांच्या शेतातील लिंबाच्या झाडाला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन जीवन संपवले. आत्महत्येपूर्वी त्यांनी व्हॉट्सॲप आणि इन्स्टाग्राम या सोशल मीडियावरून आई, पप्पा मला माफ करा, मी तुमचा गुन्हेगार आहे अशा शब्दांत कुटुंबाची माफी मागितल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी अजित गणेश पांचाळ (वय २५, व्यवसाय मजुरी) यांनी ढोकी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, नैराश्यातून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मृत कैलास पांचाळ हे कुटुंबाचे प्रमुख कमावते होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, ४ वर्षांची मुलगी आणि २ वर्षांचा मुलगा असा परिवार असून, त्यांच्या अचानक जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल सय्यद करत आहेत.

## परंड्यात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारला

### शहरात उत्साहाचे वातावरण...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ एप्रिल -**
शहराची आजची सकाळ ऐतिहासिक व भावनिक क्षणांनी उजाडली. शहरातील शिवाजी महाराज चौकात अज्ञात शिवप्रेमींनी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारल्याने संपूर्ण शहरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बुधवार, दि. १ एप्रिल रोजी उशिरा रात्री हा पुतळा बसवण्यात आल्याची माहिती सकाळी नागरिकांना मिळताच परंडा शहरासह ग्रामीण भागातून शेकडो शिवप्रेमींनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी फटाके फोडून, जयघोष करत आणि जल्लोषात शिवरायांचे स्वागत करण्यात आले.




सकाळपासूनच पुतळा पाहण्यासाठी नागरिक, युवक आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने जमा झाले होते.

शिवरायांचा पुतळा कोणत्याही परिस्थितीत हटवू नये, तो बंदिस्त करू नये आणि शिवप्रेमींच्या भावना जपाव्यात, अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली

यावेळी नगराध्यक्ष जाकीर सौदागर, शिवसेना जिल्हाप्रमुख रणजित पाटील, आरपीआयचे राज्य चिटणीस संजयकुमार बनसोडे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवप्रेमी उपस्थित होते.

## बोलेरोच्या धडकेत युवक जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ एप्रिल -**
अपसिंगा शिवारात झालेल्या भीषण अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला असून दुसरा जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सृष्टीराज उर्फ रोहित बाळासाहेब सोनवणे (वय २३, रा. अपसिंगा) व रोहन हिराचंद रोकडे हे दोघे दि.२७ मार्च रोजी सायंकाळी मोटरसायकलवरून जात होते. यावेळी टाटा सामाजिक संस्थेच्या पाटीमागे सुमारे अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या अपसिंगा शिवारात बोलेरो (क्र. एमएच २५ एजे ५६८१) चालक विशाल बळवंत क्षीरसागर (रा. अपसिंगा) याने वाहन हायगयी व निष्काळजीपणे चालवून मोटरसायकलला जोरदार धडक दिली. यात सोनवणे यांचा मृत्यु झाला.

## नळदुर्गमध्ये मतदार यादी पुनरावलोकनाला ब्रेक; बीएलओंच्या कामचुकारपणावर नागरिक संताप

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ एप्रिल -**
शहरात मतदार यादींच्या विशेष पुनरावलोकन (डखढ) मोहिमेला अपेक्षित वेग मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे. या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या काही बीएलओंच्या हलगर्जीपणा व कामचुकार वृत्तीमुळे प्रक्रिया रखडल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. अनेक प्रभागांमध्ये नागरिकांना आपल्या भागातील बीएलओ कोण आहेत याचीही माहिती नसल्याचे दिसून येत आहे.

निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्या स्वच्छ व पारदर्शक ठेवण्यासाठी सध्या पुनरावलोकन मोहीम राबविण्यात येत आहे. नळदुर्ग शहरातील १७ मतदान केंद्रांसाठी १७ बीएलओंची नियुक्ती करण्यात आली असून त्यामध्ये नगरपालिका कर्मचारी व शिक्षकांचा समावेश आहे. या बीएलओंनी प्रत्येक घरापर्यंत जाऊन मतदारांची पडताळणी करणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेणे, तसेच पात्र मतदारांची नावे यादीत कायम ठेवणे ही जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी बीएलओ उपस्थित नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. परिणामी, मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती किंवा वगळणी यासंदर्भातील कामे ठप्प झाली आहेत. येणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मयत व्यक्ती, बोगस मतदार आणि दुबार नावे वगळणे अत्यंत आवश्यक असताना कामात होत असलेली दिरंगाई चिंताजनक मानली जात आहे.

नागरिकांच्या मते, बीएलओंनी मतदारांना आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करणे, तसेच प्रत्येक घरापर्यंत पोहोचून सत्यता तपासणी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संबंधित प्रभागातील नगरसेवकांनीही आपल्या भागातील बीएलओंची माहिती घेऊन कामावर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांमध्ये जनजागृती मोहीम राबवावी, तसेच कामात कुचराई करणाऱ्या बीएलओंवर कारवाई करावी किंवा त्यांच्या जागी तत्पर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे. यासोबतच आतापर्यंत झालेल्या कामाचा आढावा घेण्याचीही मागणी जोर धरत आहे.

भाजपचे माजी शहराध्यक्ष पद्माकर घोडके, सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे यांच्यासह अनेक नागरिकांनी तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्याकडे तक्रार करून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## सौर प्रकल्पातून साडेदोन लाखांचा माल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१ एप्रिल -**
तालुक्यातील परतापूर येथे असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे २ लाख ६७ हजार रुपयांचा माल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२१ मार्च रोजी पहाटेच्या दरम्यान बी.यू. भंडारी एनर्जी प्रा. लि. व ताराणी रिन्युएबल एनर्जी प्रा. लि. यांच्या गट क्रमांक ११८, परतापूर (ता. कळंब) येथील प्रकल्पातून अज्ञात व्यक्तींनी साहित्य चोरी केले.

चोरट्यांनी कॉपर बॉन्डेड रॉड (१७.२ मिमी व्यास, ३ मीटर लांबी) तसेच २५० मायकॉन वेल्डेड क्लॅम्प ८५ नग व प्युअर कॉपर स्ट्रिप (३२ बाय ६ मिमी) अंदाजे १०५ किलो असा एकूण २,६७,६७५ रुपयांचा माल लंपास केला.

याप्रकरणी फिर्यादी सचिन नवनाथ घुमरे (रा. तपनेश्वर गल्ली, जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) यांनी दि.३१ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## शेतकऱ्यांवर करांचा भार; उद्योगांना सवलती, शेतसाऱ्याची माफीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१ एप्रिल -**
राज्य शासनाने विविध उद्योग-व्यवसायांना कर सवलती देत असताना शेतकऱ्यांकडून मात्र शेतसारा व शिक्षणकराची सक्तीने वसुली केली जात असल्याचा आरोप शेतकरी वर्गातून होत आहे. या दुजाभावाविरोधात संताप व्यक्त करत शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याची मागणी पुढे येत आहे.

जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी सातत्याने आस्मानी संकटांमुळे त्रस्त असताना शासनाच्या धोरणांमुळे आणखी अडचणीत सापडत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

मोठ्या उद्योगधंद्यांचे कर माफ केले जात आहेत, अकृषी जमिनींना विविध सवलती दिल्या जात आहेत; मात्र शेतकऱ्यांकडून तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांमार्फत शेतसारा व शिक्षणकराची सक्तीने वसुली होत असल्याने नाराजी वाढत आहे.

### मुख्यमंत्री देंवेद्र फडणवीस यांना निवेदन...

शासन एका बाजूला साखर कारखाने, खडी क्रशर, धाबे-हॉटेल तसेच इतर उद्योगांना कर सवलती देत असताना शेतकऱ्यांवर मात्र करांचा बोजा टाकत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबाबत असा दुजाभाव का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांचे शेतसारा व शिक्षणकर माफ करावेत, अशी मागणी शाम कमलाकर साठे यांनी केली आहे.

त्यांनी तहसीलदार, तुळजापूर यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली आहे.

## 'महाराष्ट्र अकॅडमी'त अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१ एप्रिल -**
शहरातील महाराष्ट्र अकॅडमी येथे अमली पदार्थांविरोधात जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला युवक-युवतींसह एकूण ५९ जण उपस्थित होते. तसेच तीन मार्गदर्शक व्याख्यानेही आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमात अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने युवा पिढीमध्ये वाढत असलेल्या नशेच्या प्रवृत्तीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. एमडी, गांजा, अफू यांसारख्या अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले. यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वाहेद

### युवक-युवतींची उपस्थिती

मुल्ला यांनी युवकांनी नशेपासून दूर राहावे, असे आवाहन केले. तसेच परिसरात कुठेही अमली पदार्थांचा वापर किंवा विक्री आढळल्यास तात्काळ टास्क फोर्सला माहिती देण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास हनुमान पुरके, हवालदार शैला टेळे, सुरेश राऊत, नागेश केंद्रे, निलेश सरपळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## उमरग्यात गुटखा विक्रीप्रकरणी कारवाई

**उमरगा, दि.१ एप्रिल -**
शहरातील शिवनेरी पान स्टॉल येथे प्रतिबंधित गुटखा विक्रीसाठी ठेवलेल्या साहित्यावर पोलिसांनी कारवाई करत ३,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी दयानंद त्रिंबक रणखांब (रा. कडदोरा, ता. लोहारा) यांनी दि.३१ मार्च रोजी सायंकाळी उमरगा येथील चौकातील शिवनेरी पान स्टॉलमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा व तत्सम पदार्थ विक्रीसाठी साठवून ठेवले होते.

उमरगा पोलीस ठाण्याच्या पथकाने छापा टाकून विमल पान मसाला, तंबाखू आदी साहित्य जप्त केले.

# लोहारा तालुक्यात निकृष्ट दर्जाच्या कामांवर नागरिकांचा रोष





### रस्ते कामांबाबत चौकशीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१ एप्रिल -**
तालुक्यात काही महिन्यांपूर्वी करण्यात आलेल्या तसेच सध्या सुरू असलेल्या विकासकामांच्या दर्जाबाबत नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग, लोहारा अंतर्गत सुरू असलेल्या विविध रस्ते कामांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मोघा बु. ते वाडी वडगाव या सुमारे तीन किलोमीटरच्या डांबरीकरण रस्त्याचे काम सुरू असले तरी काम पूर्ण होण्यापूर्वीच रस्ता उखडत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत शंका उपस्थित होत आहे. दरम्यान, वाडी वडगाव ते माळेगाव या सिमेंट रस्त्याचीही अल्पावधीतच दयनीय अवस्था झाली आहे. नुकताच तयार झालेल्या या रस्त्यावर अनेक ठिकाणी भेगा पडल्याचे दिसून येत असून, शासनाचा निधी वाया गेल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. या खराब रस्त्यांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून प्रवाशांचीही गैरसोय होत आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील अनेक विकासकामांमध्ये संबंधित विभागातील अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कामे पूर्ण झाल्याचे दाखवून प्रत्यक्षात दर्जाहीन कामे करून शासन निधीचा अपव्यय होत असल्याची चर्चा जोर धरत आहे.

विशेष म्हणजे या सर्व प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे संबंधित कामांची तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

अन्यथा विकासाच्या नावाखाली सुरू असलेला हा 'निकृष्ट कामांचा खेळ' थांबणार का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.

मोघा बु ते वाडी वडगाव रस्त्याचे काम सुरू असून माती मिश्रीत मुरुम व उकडलेला रस्त्याची चौकशी करून संबंधित गुतेदाराकडुन काम करून घेतले जाईल असे कनिष्ठ अभियंता पठाण यांनी सांगितले.

# धाराशिव जिल्ह्यात उभरतं युवक नेतृत्व : शंतनू पायाळ...

...... ४७८ उमेदवारांना थेट रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या, तर ५०३ उमेदवारांची निवड पुढील प्रक्रियेसाठी करण्यात आली. 'जॉब फेअर इंडिया'च्या संचालिका सौ. तस्मिया शेख यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण नियोजन यशस्वीरीत्या पार पडले. अतिवृष्टी व पुराच्या पार्श्वभूमीवर युवकांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा हा प्रयत्न विशेष ठरला.

या मेळाव्यात केवळ नोकरीच नव्हे, तर स्वयंरोजगारासाठी विविध शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन देण्यात आले. त्यामुळे उद्योजकतेकडे वळणाऱ्या युवकांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. दरम्यान, हावरगाव (ता. कळंब) येथील डीडीएन एसएफए लि. युनिट क्र. २ येथे आमदार पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सहाव्या गळीत हंगामाचा शुभारंभ व मोळी पूजन सोहळा पार पडला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा उद्योग रोजगार, आर्थिक स्थैर्य आणि ग्रामीण विकासाचा मजबूत आधार बनत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

ग्रामस्तरावर थेट संवाद साधण्यावर भर देत माळकरंजा येथे शंतनू पायाळ यांनी सदिच्छा भेट दिली. श्री नरसिंह मंदिर व मारुती मंदिरात दर्शन घेत ग्रामस्थांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली. यानंतर नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि विकासासंदर्भातील सूचनांची सविस्तर माहिती घेण्यात आली. 'चाय पे चर्चा'च्या माध्यमातून स्थानिक प्रश्नांवर खुल्या वातावरणात चर्चा घडून आली. याच भेटीदरम्यान भैरवनाथ वीटभट्टीला भेट देत स्थानिक उद्योगांची पाहणी करण्यात आली. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या अशा उद्योगांना सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बोरगाव बु., वाटवडा बु. आणि गोविंदपूर या गावांमध्येही भेटी देत ग्रामस्थांशी सखोल संवाद साधण्यात आला. स्थानिक पातळीवरील समस्या, नागरी सुविधा, रोजगार आणि विकासकामांवर चर्चा करत लोकसहभागातून विकास साधण्यावर भर देण्यात आला.



आरोग्य क्षेत्रातही महत्त्वपूर्ण पाऊल टाकत देवळाली येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिरात सहभाग नोंदवण्यात आला. तेरणा मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांना मोफत तपासणी व उपचार सुविधा उपलब्ध करून दिली. मोठ्या संख्येने नागरिकांनी याचा लाभ घेतला. यावेळी गरजू युवक अविनाश खाडे याला वैद्यकीय मदतीचे आश्वासन देण्यात आले.

वडगाव (शि.) येथे ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या आरोग्य, गरजा आणि अनुभव जाणून घेण्यात आले. समाजाच्या सर्व घटकांना सोबत घेऊन विकास साधण्याचा प्रयत्न या उपक्रमांतून दिसून आला. एकूणच, रोजगारनिर्मिती, उद्योग प्रोत्साहन, आरोग्य सेवा आणि ग्रामसंवाद यांचा संगम साधत शंतनू पायाळ यांनी बदलाची दिशा.. विश्वासाची साथ! हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून साकारला असून आगामी काळातही असेच उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## येरमाळानगरी स्वागतासाठी सज्ज...

# आई येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेस आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१ एप्रिल -**

धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा येथील प्रसिद्ध श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा उद्यापासून मोठ्या उत्साहात सुरू होत आहे. या यात्रेसाठी जिल्ह्यासह राज्यभरातून लाखो भाविक येण्याची शक्यता असून, संपूर्ण गाव यात्रेच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे.



यात्रेनिमित्त मंदिर परिसरात विशेष सजावट करण्यात आली असून, देवीच्या गाभाऱ्यात विविध धार्मिक विधी, अभिषेक, पूजा-अर्चा यांचे आयोजन करण्यात आले आहे. चैत्र पौर्णिमेच्या दिवशी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी अपेक्षित आहे. येडेश्वरी देवी ही जागृत देवस्थान मानली जात असल्याने महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक व तेलंगणा राज्यांतूनही भाविक मोठ्या संख्येने येथे दाखल होतात.



यात्रेदरम्यान भजन, कीर्तन, हरिपाठ, जागरण-गोंधळ यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच पारंपरिक जत्रेमध्ये विविध दुकाने, खेळणी, मिठाई, घरगुती वस्तू, कपडे आदींचा मोठा बाजार भरतो, ज्यामुळे यात्रेला वेगळीच रंगत प्राप्त होते.

यात्रेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सर्व आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. पोलीस विभागाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून, वाहतूक व्यवस्थेसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध ठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

आरोग्य विभागाकडून तात्पुरते दवाखाने व प्राथमिक उपचार केंद्र सुरू करण्यात येणार असून, स्वच्छता आणि पाणीपुरवठा यासाठी ग्रामपंचायत व स्थानिक प्रशासन सज्ज झाले आहे. भाविकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याची, निवासाची तसेच पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्थानिक नागरिक, व्यापारी आणि स्वयंसेवी संस्थांनीही यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी पुढाकार घेतला आहे. यात्रेमुळे गावातील आर्थिक उलाढाल वाढणार असून, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

चैत्र पौर्णिमा यात्रा ही केवळ धार्मिक उत्सव नसून, ती स्थानिक संस्कृती, परंपरा आणि श्रद्धेचा महत्त्वाचा भाग आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या या यात्रेकडे सर्वांचे लक्ष लागले असून, भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.











